# लातूर शहर महानगरपालिका,लातूर

## प्रशासकीय ठराव

नगर रचना विभाग

**अंतिम ठराव क्रमांक** 397 दि. 21/11/2025

---

विषयः- लातूर शहर मनपा हद्दीमध्ये PM E-BUS योजना करीता बस डेपो उभारण्याच्या अनुषंगाने मंजूर विकास योजनेतील मनपाच्या मालकीच्या जागेवरील आरक्षण क्रमांक ७१ गार्डन बदलुन त्याऐवजी बस डेपो असा फेरबदल महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करणे बाबत.

**प्रस्ताव: -**

लातूर शहर मनपा हद्दीमध्ये नवीन PM E-BUS सेवा योजना करीता बस डेपो उभारण्याच्या अनुषंगाने मंजूर विकास योजनेतील मनपाच्या मालकीच्या जागेवरील आरक्षण क्रमांक ७१ गार्डन बदलुन त्याऐवजी बस डेपो असा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ अन्वये फेरबद्दल करणे बाबत.

संदर्भः- १)मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांचे दि.११/०८/२०२३ व दि.१३/१०/२०२३ रोजीचे पत्र.

२) अतिरीक्त आयुक्त,लातूर शहर मनपा,लातूर यांचे दि.०२/११/२०२३ रोजीचे पत्र.

३) उपायुक्त/नोडल अधिकारी PM E-BUS सेवा यांचे पत्र जा.क्र.लाशमनपा/७५९८/ २०२३-२४ दि.०१/१२/२०२३ रोजीचे आरक्षण बदल करणे करीता पाठवलेले पत्र.

४)लातूर शहर महानगरपालिका,लातूर यांचा प्रशासकीय ठराव क्र.१९२ दि.१५/०३/२०२४ रोजीचा

५) आयुक्त म.न.पा.लातूर यांचे पत्र जा.क्र.लाशमनपा/नरवि/२१६१/दि.२०२३-२४ दि.२०/०३/२०२४ रोजीचा पत्र

६) आयुक्त म.न.पा.लातूर यांचे पत्र जा.क्र.लाशमनपा/नरवि/८१८५/दि.२०२४-२५ दि.१५/१०/२०२४ रोजीचा पत्र

७)मा.अवर सचिव यांचे पत्र क्र.टिपीएस/३७२५/७१४/प्र.क्र.७५/२०२५/नवि/३० दि.०४/०९/२०२५

८) लातूर शहर महानगरपालिकेचा प्रशासकिय ठराव क्र. ३५९ दि ०३/१०/२०२५

९) दैनिक प्रतिव्यवहार वृत्तपत्रामध्ये दिलेले दि. १८/१०/२०२५ रोजीची जाहीर सूचना

१०) दैनिक राजसत्ता वृत्तपत्रामध्ये दि १८/१०/२०२५ रोजीची जाहीर सूचना

११) साप्ताहिक लातूर मिशन दि २३/१०/२०२५ रोजीची जाहीर सूचना

१२) महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि १६/१०/२०२५ रोजीचे

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी, लातूर शहर महानगरपालिके करिता PM E-BUS सेवा योजना मंजूर झाली असून या अंतर्गत लातूर शहर महानगरपालिके करिता ५० इ बसेस मंजुरी मिळणे करिता प्रस्तावित आहेत. सदर Ministry of Housing and Urban Development केंद्र सरकार यांचे कडून या योजने अंतर्गत ५० बस खरेदी करून GCC (Gross Cost Contract) कॉन्ट्रैक्ट पद्धतीने शहरात बस सेवा देण्याकरिता प्रस्तावित आहेत.

सदर योजनेत ४ MW सब स्टेशन, बस पार्किंग व त्याकरीता लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर (पायाभूत सुविधा) केंद्र शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या सेवा उपलब्ध करणे करता महानगरपालिका नोडल अधिकारी, Maharashtra State Electricity Distribution Company Limited, Maharashtra State Road Transport Corporation (महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ) Convergence Energy Services Limited (CESL). या

शासकीय संस्था स्टेक होल्डर (भागधारक) आहेत. तसेच ५० बसेस साठी लागणारी जागा २ एकर च्या अधिक लागणार आहे. तसेच SOS ग्रीन बेल्ट ची जागा उपलब्धते बाबत मालमता विभागाने अहवाल दिला आहे.

केंद्र शासनाने महानगरपालिकेच्या जागेची मालकी, सबस्टेशनची उपलब्धता/त्याकरिता लागणा-या जागेची उपलब्धता व शहरापासून जवळची जागा असावी असे निर्देश होते. तसेच बसेस बाबत कोणत्या व किती शहरासाठी गरजेच्या आहेत (मिडी स्टैंडर्ड) या याकरिता प्रश्नावली दिलेली आहे. तरी या बैठकीदरम्यान व भागधरकांच्या एकत्रित सर्वेक्षण अंतर्गत मालमता विभाग (ला. श. मनपा), परिवहन विभाग (ला. श. मनपा) यांनी दिलेल्या अहवालानुसार लातूर शहर महानगर पालिकेचे स्वतःच्या मालकीचे मौ.लातूर स्थीत सर्वे नं.५१,५२,५३ भागशः मधील आरक्षण क्र.७१ गार्डन चे एकुण क्षेत्रफळ १.६० हे.आर हि जागा SOS शेजारी गरुड चौक,लातूर येथे उपलब्ध आहे असे कळविण्यात आलेले आहे.

मंजूर विकास योजना,लातूर नुसार आ.क्र.७१ बगीचा हे आरक्षण सेक्टर २ मध्ये समाविष्ठ आहे तरी सेक्टर २ मध्ये लोकसंख्ये नुसार बगीचाचे एकुण क्षेत्र ४ हेक्टर इतके विकास योजना मानका प्रमाणे गरजेचे आहे.सदर सेक्टर मध्ये आ.क्र.६१-२ हे आर,आ.क्र.५७- १.३५ हे आर,आ.क्र.५१-३ हे आर,आ.क्र.७१-१.९५ हे आर अशी आरक्षणे बगीचासाठी प्रस्तावीत आहेत.एकुण क्षेत्र ८.३ हे आर इतके आरक्षित केलेले आहे.तसेच मंजूर विकास योजने नुसार आ.क्र.७१ बगीचाचे मुळ क्षेत्र १.९५ हे.आर होते परंतू मंजूर विकास योजना दुरुस्ती क्र.९ अन्वये ०.३५ हे.आर इतके क्षेत्र आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ केले आहे त्यामुळे सद्यस्थितीत मंजुर विकास योजनेत आ.क्र.७१ चे क्षेत्र १.६० हे.आर इतके शिल्लक आहे.आ.क्र.७१ बगीचा क्षेत्र १.६ हे.आर वगळल्यास विकास योजनेच्या मानकाचे उल्लंघन होत नाही तसेच बस डेपो साठी आवश्यक असणारे क्षेत्र व रस्त्याची रुंदी जागेवरती उपलब्ध आहे.तसेच जवळच गरुड चौक उपलब्ध असल्याने बसेसमुळे भविष्यात वाढणारी वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत होईल तसेच बस डेपो योजनेमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपध्दतीने रोजगार निर्मिती होण्यास मदत होईल या कारणामुळे प्रस्तावीत गार्डन हे आरक्षण बदलून बस डेपो असे आरक्षणात फेरबदल करणे सोयीस्कर ठरेल.

त्यानुषंगाने,महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) व संदर्भ क्र.८ अन्वये लातूर शहर महानगरपालिका विकास आराखडानुसार आ.क्र.७१ बगिचा आरक्षणात फेरबद्दल करून PM E-BUS बस डेपो या वापराकरिता प्रस्तावित करण्यात यावे याबाबतचा ठराव नियोजन प्राधिकरणाने घेतला आहे . तसेच संदर्भ क्र ९ ते ११ अन्वये उपरोक्त विषयांकीत प्रकरणी वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन देण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र १२ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रमध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहे तसेच प्रकरणी नागरीकांच्या सुचना व हरकती प्राप्त झालेले नाहीत

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनयमाचे कलम ३७ अन्वये आरक्षण क्रमांक ७१ बगीचा हे नामाभिदान बदलुन त्याऐवजी बस डेपो असा फेरबदल करणे बाबतचा आणि त्याऐवजी बस डेपो चा वापर अनुज्ञेय करणे बाबतचा नमुद तक्ता क्र.०१ मधील प्रस्ताव मंजुरीस तथा निर्णयास्तव सादर.

तक्ता क्र.१

| मंजूर विकास अराखड्यानुसार | | | | | | प्रस्तावीत फेरबदल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विकास योजनेचे नाव | सर्वे नं. | आरक्षण क्र. | आरक्षणाचे नाव | बाधीत क्षेत्र | सर्वे नं. | आरक्षण क्र. | आरक्षणाचे नाव | बाधीत क्षेत्र |
| 1. | लातूर शहर मनपा ,लातूर | 51.(पै.)<br>52.(पै.)<br>53.(पै.) | आ.क्र.71 | बगीचा | 1.60 हे.आर | 51.(पै.)<br>52.(पै.)<br>53.(पै.) | आ.क्र.71 | बस डेपो | 1 हे. 60 आर (मनपाच्या मालकीचे क्षेत्र.) |

**निर्णयः-** महराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये आरक्षण क्र.७१ बगीचा (Garden) ऐवजी बस डोपो ( Bus Depo) असा फेरबदल करण्याबाबतच्या प्रस्तावावर सुचना व हरकती मागविण्यात आल्या असता विहीत मुदतीत नागरीकांकडुन कोणत्याही सुचना व हरकती प्राप्त झालेल्या नाहीत त्यामुळे सदर प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.तसेच सदरील विषयात वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

आयुक्त तथा प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

## प्रशासकीय ठराव

**ठराव क्रमांक :-** 398 **दिनांक** 21 / 11 / 2025

---

**विषय :-** जिल्हा वार्षिक योजना 2025-2026 अंतर्गत लातूर शहरातील खालील विकास कामांना मंजूरी देणे बाबत.

**प्रस्तावना -** शहरातील नागरिक लोकशाही दिनात नागरी सुविधा मिळणेसाठी अर्ज देतात. तसेच विविध संघटना, नागरीक यांनी निवेदने देऊन नागरी सुविधा पुरविणेसाठी कळवितात. त्यानुषंगाने जिल्हा वार्षिक योजना नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजना सन 2025-2026 अंतर्गत खालील कामे प्रस्तावित करण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अं.किंमत |
|---|---|---|
| 1. | प्र.क्र.12 विठ्ठल रुक्मिणी नगर येथे डिसले सर दुकान ते ऋषिकेश अपार्टमेंट पर्यंत रस्ता व नाली करणे. | 1000000.00 |

तरी वरील प्रमाणे विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

**निर्णय** - वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास कामे जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत नागरी दलीतेत्तर वस्ती सुधार योजना अंतर्गत सन 2025-2026 साठी प्राप्त होणा-या निधीमधून हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

**नगर सचिव**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

**प्रशासक,**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

# लातूर शहर महानगरपालिका,लातूर
## प्रशासकीय ठराव क्रं.399. दिनांक -05/12/2025

**विषय - लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व बी ओ टी तत्वावरील व्यापारी संकुलातील गाळे धारकांना व्याजामध्ये 100% सुट देणे बाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-**

मनपा मालकीच्या गाळे धारकांना सन 2025-26 चे मागणी देयक वाटप करण्यात आलेले आहेत. सदर मागणी देयक वाटप केल्यानंतर वसुली लिपीक हे गाळा भाडयाची मागणी करण्यासाठी गाळे धारकांकडे जात असताना गाळे धारक हे वारंवार व्याजास, दंडास व अकृषी दरात सुट दिल्यानंतर रक्कम भरण्यास तयार असल्या बाबत सांगत आहेत. व व्याज, दंड व अकृषी करामध्ये सुट मिळण्यासाठी व्यापारी संकुल संघ यांनी दि. 27/11/2025 रोजी पत्र देवून मागणी केलेली आहे.

लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकांची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने, तसेच गाळेधारकांस गाळे भाडे भरणा करण्याकरिता प्रवृत्त करण्यासाठी गाळे भाडे थकीत असलेल्या गाळे धारकांस दि.08/12/2025 ते दि.31/12/2025 पर्यंत एक रक्कमी गाळे भाडयाचा भरणा करणा-या गाळेधारकांस व्याज / शास्तीमध्ये सुट लागू केल्यास गाळेधारक भाडे भरणा करण्यास प्रवृत्त होतील व यामुळे महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्नात वाढ होईल. तसेच लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व बी ओ टी तत्वावरील व्यापारी संकुलाची व्याज व दंडासहीत एकुण मागणी ही 135640382/- एवढी आहे. त्यापैकी एकुण दंड 7801391/- व एकूण व्याज 17038034/- हे खालीलप्रमाणे व्यापारी सकुल निहाय आहे.

| अनु.क्रं. | व्यापारी संकुलाचे नांव | दंड | व्याज |
|---|---|---|---|
| 1 | गांधी चौक व्यापारी संकुल. | 976951 | 1959423 |
| 2 | मिनी मार्केट | 75756 | 146363 |
| 3 | गांधी मैदान सा.क्रं. 111 | 1929507 | 3940070 |
| 4 | गांधी मैदान सा.क्रं. 112 | 1450998 | 3049459 |
| 5 | गांधी मार्केट | 153086 | 310993 |
| 6 | गंजगोलाई | 24771 | 49542 |
| 7 | सारोळा रोड | 214541 | 429083 |
| 8 | फ्रुट मार्केट सा.क्रं.82 | 2975781 | 5926789 |
| 9 | नविन यशवंतराव चव्हाण व्या.सं. | | 56273 |
| 10 | जुनी न.प. | | 14544 |
| 11 | रिगल सिनेमा समोरील व्या.सं. | | 170071 |
| 12 | सम्राट चौक | | 232032 |
| 13 | ग्रेन मार्केट सा.क्रं.82 | | 504992 |
| 14 | यशवंतराव चव्हाण व्या. सं. | | 40362 |
| 15 | मटन मार्केट सा.क्रं. 110 | | 29392 |
| 16 | गांधी चौक पाण्याची टाकी | | 161044 |
| 17 | गांधी मैदान बसस्टॅन्ड बाजूस | | 17602 |
| | **एकुण** | **7801391** | **17038034** |

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 कराधान प्रकरण आठ नियम 51 अन्वये मा. आयुक्त यांना आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार नियम 41 नुसार व्याज/शास्तीमध्ये अंशत: किंवा पूर्णत: सूट देण्याचा अधिकार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे विषयांकित प्रकरणा बाबत विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय :-**

**उपरोक्त प्रस्तावानुसार लातूर शहर महानगरपालिका मालकीच्या व बी ओ टी तत्वावरील व्यापारी संकुलातील गाळे धारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड कराधान प्रकरण 8 मधील नियम 51 अन्वये आयुक्तास नियम 41 खालील व्याज/शास्तीमध्ये पूर्णत: 100 % सूट देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.**

नगर सचिव
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

प्रशासक
लातुर शहर महानगरपालिका, लातुर

# प्रशासकीय ठराव

## लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्रमांक - 400 दिनांक 11 /12/2025

**विषयः-** अग्निशमन विभागासाठी अत्याधुनिक असे FIRE WATER BOWSER 0N 28 TON खूली चेचीस व बॉडी बांधकामसह खरेदी करणे करिता दर पत्रक मागविणेत आले असता **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे सर्वात कमीचे निविदा दर मंजूर करणे बाबत..

**संदर्भः-** या कार्यालयाचे इ-टेंडर क्र.NIT/Fire/9353/2025-26 दि.31.10.2025 अन्वये.

**प्रस्तावः-**

जिल्हा वार्षिक योजना सन 2025-2026 अंतर्गत अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटिकरण करणे जिल्हास्तरीय योजने अंतर्गत अनुदान एकूण रक्कम रूपये **1,70,75,000/-** निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी लातूर यांचे पत्र जा.क्र.2025 /नपाप्र /अग्नि./कावि-7402 दिनांक 24.10.2025 अन्वये या कार्यालयास वितरित केलेले अग्निशमन अनुदान रक्कम रु. **1,70,75,000/-** रुपयास प्रशाकिय मान्यता प्रदान केले आहेत.

तसेच मा.आयुक्त लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांनी शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तीचे व वित्तीय अधिकाराचे तसेच मा.संचालक,अग्निशमन सेवा महाराष्ट्र शासन यांचे तांत्रिक मान्यतेच्या अटी व शर्तीचे काटेकोर पालन करणे व ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत कळविले आहेत त्यानुसार प्रशाकिय मान्यता प्राप्त झाले प्रमाणे ई- निविदा मागविणेत आले असता एकूण 03 निविदाधारकांनी ( ठेकेदारांनी ) सहभाग नोंदविले त्यात **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे दर सर्वात कमीचे असुन मंजूर दराचा तपशील खालील प्रमाणे.

| आ.क्र. | कंपनीचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | NIDHI ENTERPRISES,MUMBAI | पात्र |
| 2 | WORLD FIRE ENTERPRISES, GURGAON HARYANA | पात्र |
| 3 | VISHA AUTOMOTIVE SALES & SERVICES PVT. LTD. AKOLA | पात्र |

| आ. क्र. | वाहनाचा तपसिल | एकूण नग | | कंपनीचे नाव | दर | दिलेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Design,Construction,Fabrication, Erection,Testing and Commiss- -ioning of 14 KL FireWater Bowser on 28 ton GVW BS -VI Chassis. (Inclusive Of Chassis) | 01 | 1 | NIDHI ENTERPRISES, MUMBAI | 1,70,69,000.00 | - 0.035 Below | L1 |
| | | | 2 | VISHA AUTOMOTIVE SALES & SERVICES PVT. LTD. AKOLA | 1,73,10,000.00 | + 1.366 Above | L2 |
| | | | 3 | WORLD FIRE ENTERPRISES, GURGAON HARYANA | 1,74,74,000.00 | + 2.309 Above | L3 |

तरी प्रस्तावित प्रस्तावा प्रमाणे आ.क्र. 01 कॉलम क्र. 04 प्रमाणे आ.क्र. 01 चे मंजूर दर रू. **1,70,69,000/-** खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यतेसह खर्च करणेच्या मंजूरीस्तव सादर.

**निर्णयः- अग्निशमन विभागासाठी अत्याधुनिक असे** FIRE WATER BOWSER 0N 28 TON खूली चेचीस व बॉडी बांधकामसह खरेदी करणे करिता दर पत्रक मागविणेत आले असता **NIDHI ENTERPRISES, MUMBAI** यांचे सर्वात कमीचे **L1** निविदा दर रक्कम रू. **1,70,69,000/-** खर्च करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

**नगर सचिव**
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

**प्रशासक**
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

# प्रशासकिय ठराव
## लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. ४०७ दि. १२/१२/२०२५

---

विषय :- **Providing & Supplying of Machineries-Shredding Machine, screening machine with belt conveyor, compost sieve, squeezer for wet waste, plastic shredder machine, automated MRF sorting system with RDF facility, horizontal Beller machine, plastic dust remover, segregation conveyor with seating facility and bins and other works as per BOQ for municipal solid waste management work at Latur municipal corporation under Swachh Bharat mission (urban 2.0)**

प्रस्ताव :-

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.स्वमअ-२०२५/CN११५६३८६(१२)/ नवि-३५ अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका, लातूर च्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास दि.११.०६.२०२५ रोजी प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे.

लातूर शहर महानगरपालिका, लातूर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास रू.१७,३१,३१,०००/- (अक्षरी सतरा कोटी ऐकतीस लक्ष ऐकतीस हजार फक्त रूपये) मंजूर असून Machine Work करिता रू.४,४४,२७,२३७/- (अक्षरी चार कोटी चव्वेचाळीस लक्ष सत्तावीस हजार दोनशे सदोतीस रूपये फक्त) ची मंजूर असून Machine Work कामासाठी मा.आयुक्त महोदया यांच्या मान्यतेने Tender ID No. 2025_LMC_1252809_1 दि.२७.११.२०२५ ते दि.०५.१२.२०२५ पर्यंत प्रसिध्द करण्यात आली होती. तरी विहीत वेळेत एकूण ०४ निवीदाधारक प्राप्त झाले असून त्यांचा पात्र ०१ लिफाफा (तांत्रिक) मा.उपायुक्त यांच्या मान्यतेने उघडण्यात आला असून एकूण ०४ निवीदाधारका पैकी ०१ निवीदाधारक अपात्र झाले असून ०३ निवीदाधारक पात्र असून पात्र निवीदाधारकांचे ०२ लिफाफा (आर्थीक) दि.१२.१२.२०२५ रोजी उघडण्यात आला असून दर खालील प्रमाणे.

| अ.क्र | कंत्राटदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | NEW SAI FIBER | ४,४३,८२,८०९/- (-०.१००) |
| २ | MEERA STEEL FABRICATION AND FIBERS | ४,४२,९३,९५५/- (-०.३००) |
| ३ | SHRINIWAS INDUSTRIES | ४,४०,९८,४७५/- (-०.७४०) |

वरील प्रमाणे सर्वात कमी SHRINIWAS INDUSTRIES यांचे दर सर्वात कमी रू. ४,४०,९८,४७५/- (-०.७४०) अक्षरी चार कोटी चाळीस लक्ष अठ्ठयानव्व हजार चारशे पंच्याहत्तर रूपये सर्वात कमी असून SHRINIWAS INDUSTRIES यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापना मधील Machine Work अंतर्गत करीता SHRINIWAS INDUSTRIES यांचे दर सर्वात कमी रू. ४,४०,९८,४७५/- (-०.७४०) यांचे दरास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

# प्रशासकिय ठराव

## लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र.402 दि.12/12/2025

---

विषय – Price Escalation (भाववाढ) प्रस्तावास आर्थीक व प्रशाकिय मान्यता मिळणे बाबत.

प्रस्ताव –

लातूर शहर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये दि.12.09.2017 अन्वये रोजीच्या करारनाम्यानूसार व कार्यालयीन आदेश क्रमांक 8601 दि.14.09.2017 अन्वये घरोघरीचा नागरी घनकचरा गोळा करणे, वाहतूक करणे, केंद्रीत, विकेंद्रीत पध्दतीने कच-यावर प्रक्रिया करणे, मुख्य रस्ते झडवाई करणे, नाल्यातील गाळ काढणे, जनजागृती करणे व बांधकाम साहित्याचे विल्हेवाट लावणे करिता (5+2) वर्षा करिता कार्यादेश निर्गमीत केलेल्या दिनांकपासून अध्यक्ष, जन अधार सेवाभावी संस्था, लातूर यांना आदेश देण्यात आलेले आहेत.

जन आधार सेवाभावी संस्था, लातूर यांनी केलेल्या कामाचा भाववाढ रक्कम प्राप्त होणे करिता मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे क्र.13723/2023 क्रमांकानुसार रिट याचिका दाखल केली. त्याची सुनावणी होऊन दि.01 नोव्हेंबर 2023 रोजी मा.उच्च न्यायालयाने लिखित करारातील मुद्दा क्रमांक 04 मधील क्रमांक 49 नुसार जन आधार सेवाभावी संस्थेस लिखित करारानुसार दि.24.03.2023 रोजीच्या प्रस्तावीत बिलावर निर्णय घेण्याचे आदेशित केले आहे. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार लातूर शहर महानगरपालिकेने निर्णय न घेतल्याने जन आधार सेवाभावी संस्थेने Contement Petition No.320 of 2024 अन्वये अवमान याचिका दाखल केली आहे. या रिट याचिका क्र.320/2024 क्र.13723/2023 दि.22.05.2025 बाबत विधी अधिकारी, लातूर शहर महानगरपालिका,लातूर यांना कायदेशीर अभिप्राय देणे बाबत कळविण्यात आले होते. या प्रमाणे विधी अधिकारी यांनी ॲड.श्री. सुहास उरगुंडे, कायदे सल्लागार मनपा लातूर उच्च न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.09.10.2025 रोजी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

With reference to above mention subject matter, your office has sought my legal opinion in WP No. 13723 of 2023 and in CP No. 320 of 2024.

I have gone through your letter dated 29/09/2025 and document annexed thereto as well as copy of the WP No. 13723 of 2023 and CP No. 320 of 2024. After perusing agreement between the petitioner and the corporation, more particularly cluse no. 49 which speaks about the escalation of rates quoted.

It is also to inform you that initially the contractor has filed Writ Petition No. 13723 of 2023 seeking direction to decide its pending proposal dated 24.03.2023 for price escalation. Moreover, he has also raised the grievance that, the proposal for price escalation in 2019 for the period August 2018 to September 2019 which has been considered by the corporation in 2020 and accordingly price escalation amount has been paid to the contractor. After hearing all the parties, the Hon'ble High Court vide its judgment and order dated 01.11.2024 disposed of the writ petition No. 13723 of 2023, with direction to the corporation to decide the proposal dated 24.03.2023 in view of clause No. 49 of the agreement dated 14.09.2017.

Since, the judgment and order passed by the Hon'ble High Court, was not complied with, therefore, the contractor has filed Contempt Petition No. 320 of 2024. In the said contempt petition, upon your instructions, I have made a statement before the Hon'ble court that the proposal of the contractor / petitioner dated 24.03.2023 would be decided within 3 weeks from

the date of order i.e. from 22.07.2025 on its own merits and the said statement is recorded as an undertaking to the Hon'ble High Court.

Pursuant to the said judgment and order, the time granted by the Hon'ble High court is already elapsed, which is attributable to the aggravated contempt of the judgment and order of the Hon'ble high court.

Therefore, in my legal opinion and legal acumen, the proposal dated 24.03.2023 is required to be decided in accordance with the clause No. 49 of the agreement forthwith without any further delay.

This is for your information and necessary action.

Hence this legal opinion.

याकरीता निवीदेतील अटी व शर्तीनूसार अट क्र.49 Escalation of Rates Quoted (Price Adjustment) मधील मुद्दा क्र.04 अट क्र.49 बाब क्र.49.1, 49.2,49.3 मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे (A) Labour Escalation Component (B) Fuel Escalation Component (C) Miscellaneous (Spare parts and repair's and Maintenance) Escalation Component. धरून Price Escalation तयार करण्यात आले आहे. निवीदेतील अटी व शर्तीनूसार सन 2018-19 या कालावधीचे रू.32,70,712/- ठेकेदारास अदा करण्यात आलेले आहे. सन 2019-20, 2020-21, 2021-22, 2022-23 व 2023-24 पर्यंतचे Price Escalation (भाववाढ) खालील प्रमाणे आहे.

| Sr.No | Years | Labour | Fuel | Misc | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2019-20 | 15,79,332/- | (-) 56,40,287/- | 4,74,569/- | (-) 35,86,386/- |
| 2 | 2020-21 | 46,15,176/- | 2,16,39,312/- | 5,50,159/- | 2,68,40,647/- |
| 3 | 2021-22 | 64,10,279/- | 4,18,62,308/- | 11,47,874/- | 4,94,20,461/- |
| 4 | 2022-23 | 27,21,403/- | (-) 68,49,118/- | (-) 2,60,673/- | (-) 43,88,388/- |
| 5 | 2023-24 | 23,44,244/- | (-) 15,40,910/- | 1,67,956/- | 9,71,290/- |
| 2019 to 2024 | All Total | 1,76,70,434/- | 4,94,71,305/- | 20,79,885/- | 6,92,21,624/- |

तरी जन आधार सेवाभावी संस्था, लातूर यांना माहे सप्टेंबर 2019 पासून मंजूर करण्यात आलेल्या Gross रक्कम धरून 1 महिना अगोदर चा Index माहे ऑगस्ट 2019 चा धरून एक वर्षात अदा करण्यात आलेली Gross Amount X Augest 2019 चा Index - Augest 2020 चा Index या मधील Difference Amount ÷ Previous Tarif X Whole sale Price index धरून Augest 2019 ते Augest 2024 एकूण 5 वर्षाचे वरील प्रमाणे Price Escalation (भाववाढ) तयार करण्यात आलेले आहे. लातूर शहर महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अन्वये शासनाने वेळोवेळी घनकचरा व्यवस्थापनाबाबत दिलेल्या आदेश व निर्देशानूसार व निवीदेतील अटी व शर्तीनूसार मुळ करारनाम्याच्या आधिन राहून अ.क्र 1 ते 5 प्रमाणे सन 2019 ते 2024 या पाच वर्षाचे भाववाढ (Price Escalation) तयार करण्यांत आले असून सदर देयक <u>रू.6,92,21,624/-</u> प्रस्तावास आर्थीक व प्रशासकि मान्यता देणे बाबत उचित निर्णयास्तव सविनय सादर.

निर्णय – घनकचरा व्यवस्थापना 2016 निवीदेतील अटी व शर्तीनूसार मुळ करारनाम्याच्या अधिन राहून अ.क्र. 1 ते 5 प्रमाणे प्रलंबित भाववाढ देयक अदा करणेसाठी निधी मागणीसाठी शासनास प्रस्ताव सादर करणे बाबत <u>रू.6,92,21,624/-</u> प्रस्तावास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव

लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक

लातूर शहर महानगरपालिका,लातूर

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

## प्रशासकीय ठराव

**ठराव क्रमांक :-** 403 **दिनांक** 12/12/२०२५

---

**विषय :-** जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत लातूर शहरातील खालील विकास कामांना मंजूरी देणे बाबत.

**प्रस्तावना –**

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांचे पत्र जाक्र/सआसकला/जिवायो (अजाघका)/संकीर्ण/पत्र वर्ग/२०२५-६ ५६९४ दि. २०/११/२०२५ व सहा. आयुक्त, नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांचे पत्र जा.क्र. २०२५/नपाप्र/जिवायो/२०२५-२६/कावि-७७०२ दि. २८/११/२०२५ अन्वये खालील विकास कामे जिल्हा वार्षिक योजना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत नियमोचित कार्यवाही करावी याबाबत कळविले आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र. ०४ मध्ये मिलींद शाळेसमोरील ग्रीन बेल्ट सुशोभिकरण करणे. | १००००००.०० |
| २ | प्र.क्र. १६ मध्ये कापड मिल येथे पेव्हर रोड करणे. | १००००००.०० |
| ३ | प्र.क्र. ०५ मध्ये शिंदे यांच्या घरासमोरील पेव्हर रोड करणे. | १००००००.०० |
| ४ | प्र.क्र. ०४ मध्ये डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मनपा शाळा येथे संरक्षण भिंत बांधणे. | १००००००.०० |
| ५ | प्र.क्र. ०४ मध्ये काकणे यांच्या घरासमोरील दोन्ही बाजूस पेव्हर रोड करणे. | १००००००.०० |
| ६ | प्र.क्र. १६ मध्ये विविध ठीकाणी नाली व पेव्हर रोड करणे. | १००००००.०० |
| ७ | प्र.क्र. ०४ मध्ये गायकवाड यांचे घर ते डावरे यांच्या घरापर्यंत सी.सी. रोड करणे. | १००००००.०० |

तरी वरीलप्रमाणे विकास कामाबाबत निर्णय घेणेसाठी सादर.

**निर्णय –** वरीलप्रमाणे प्रस्तावित विकास कामे जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ साठी प्राप्त होणा-या निधीमधून हाती घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

**प्रशासक,**
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

# लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. ४०४

दि.१२/१२/२०२५

---

विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसूचित जाती नव बौध्द वस्ती सुधार २०२५-२६ अंतर्गत पुरुष व महिलासाठी लाल गोडाऊन, विवेकानंद चौक, नांदेड रोड परिसरात एकल स्वयंसफाई,स्वयंचलीत आयटी सक्षम ३ शौचालय खरेदी स्थापन आणि कार्यान्वित करणे

प्रस्ताव :-

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसूचित जाती नव बौध्द वस्ती सुधार २०२५-२६ अंतर्गत पुरुष व महिलासाठी लाल गोडाऊन, विवेकानंद चौक, नांदेड रोड परिसरात एकल स्वयंसफाई,स्वयंचलीत आयटी सक्षम ३ शौचालय खरेदी स्थापन आणि कार्यान्वित करणे बाबत मा.आयुक्त महोदया यांनी मान्यता देण्यात आली असून Gem पोर्टल वरून खालील प्रमाणे ३ कोटेशनधारकाचे दर खालील प्रमाणे.

| अ.क्र | तपशील | दर | |
|---|---|---|---|
| १ | Smart Buddy Single Self Cleaning Automated IT Enabled Toilets For Male & Female | 1,375,000.00 | L1 |
| २ | SICURO Single Cleaning Automated IT Enabled Toilets For Male + Female | 1,710,100.00 | L3 |
| ३ | Unbranded Single Self Cleaning Automated IT Enabled Toiles For Male+Female | 1,455,000.00 | L2 |

वरील प्रमाणे सर्वात कमी दर Smart Buddy Single Self Cleaning Automated IT Enabled Toilets For Male & Female यांचे दर 13,75,000/- सर्वात कमी असून Smart Buddy Single Self Cleaning Automated IT Enabled Toilets For Male & Female यांचे दर मान्यतेस्तव, निर्णयास्तव सादर.

निर्णय –लातूर शहर महानगरपालिकेतील स्वच्छता विभागासाठी पुरुष व महिलांसाठी लाल गोडाऊन, विवेकानंद चौक, नांदेड रोड परीसरात स्वंयसफाई, स्वयंचलित, आयटी सक्षम ३ शौचालय खरेदी स्थापन आणि कार्यान्वीत करण्यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसुचित जाती नवबौध्द वस्ती सुधार २०२५-२६ अंतर्गत Gem Portal वरून Smart Buddy Single Self Cleaning Automated IT Enabled Toilets For Male & Female यांचे न्युनतम दर रू.१३,७५,०००/- यास प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

# लातूर शहर महानगरपालिका, ल

## प्रशासकिय ठराव

## लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. ४०५ दि. १२/१२/२०२५

---

विषय :- नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना २०२५-२६ अंतर्गत पुरुष व महिलासाठी अशोक हॉटेल मार्केट परिसरात एकल स्वयंसफाई,स्वयंचलीत आयटी सक्षम ३ शौचालय खरेदी स्थापन आणि कार्यान्वित करणे

प्रस्ताव :-

नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना २०२५-२६ अंतर्गत पुरुष व महिलासाठी अशोक हॉटेल मार्केट परिसरात एकल स्वयंसफाई,स्वयंचलीत आयटी सक्षम ३ शौचालय खरेदी स्थापन आणि कार्यान्वित करणे बाबत मा.आयुक्त महोदया यांनी मान्यता देण्यात आली असून Gem पोर्टल वरून खालील प्रमाणे ३ कोटेशनधारकाचे दर खालील प्रमाणे.

| अ.क्र | तपशील | दर | |
|---|---|---|---|
| १ | Smart Buddy Single Self Cleaning Automated IT Enabled Toilets For Male & Female | 1,375,000.00 | L1 |
| २ | SICURO Single Cleaning Automated IT Enabled Toilets For Male + Female | 1,710,100.00 | L3 |
| ३ | Unbranded Single Self Cleaning Automated IT Enabled Toiles For Male+Female | 1,455,000.00 | L2 |

वरील प्रमाणे सर्वात कमी दर Smart Buddy Single Self Cleaning Automated IT Enabled Toilets For Male & Female यांचे दर 13,75,000/- सर्वात कमी असून Smart Buddy Single Self Cleaning Automated IT Enabled Toilets For Male & Female यांचे दर मान्यतेस्तव, निर्णयास्तव सादर.

निर्णय –लातूर शहर महानगरपालिकेतील स्वच्छता विभागासाठी पुरुष व महिलांसाठी अशोक हॉटेल मार्केट परीसरात स्वंयसफाई, स्वयंचलित, आयटी सक्षम ३ शौचालय खरेदी स्थापन आणि कार्यान्वीत करण्यासाठी नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना २०२५-२६ अंतर्गत Gem Portal वरून Smart Buddy Single Self Cleaning Automated IT Enabled Toilets For Male & Female यांचे न्युनतम दर रु.१३,७५,०००/- यास प्रशासकिय मान्यता देण्यात येते.

| | |
|---|---|
| नगर सचिव | प्रशासक |
| लातूर शहर महागरपालिका,लातूर | लातूर शहर महानगरपालिका,लातूर |

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

## प्रशासकिय ठराव

**प्रशासकिय ठराव क्रमांकः-** ४०६ **दिनांकः-१२-१२-२०२५**

**प्रस्तावः-**

**विषयः- नगर रचना विभाग अंतर्गत बांधकाम परवानगी देतांना प्राप्त मुदतबाह्य आणि दावा न सांगितलेल्या अनामत रक्कमा मनपा फंडामध्ये जमा करणे बाबत.**

लातूर शहर महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी देतांना घेण्यात आलेल्या अनामत रक्कमांवर मागील ३ वर्षापुर्वीच्या रक्कमेवर संबतीधामार्फत मागणी न केलेल्या अनामत रक्कम महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधील प्रकरण २०नियम क्रमांक २९९ अन्वये परतावायोग्य असलेल्या ठेवींचा तीन पूर्ण लेखांकन वर्षाकरिता, दावा सांगण्यात आला नाही तर अशा अनामत रकमा व्यपगत होतील आणि व्यपगत अनामत रक्कम खाते या शीर्षाखाली महानगरपालिका निधीमध्ये स्थानांतरीत होतील. महानगरपालिका महसुलांमध्ये जमा झालेल्या ठेवी महानगरपालिकेच्या मंजुरीशिवाय परतफेड करण्यात येणार नाहीत आणि जेव्हा त्यांची परतफेड करण्यात येईल तेव्हा परतफेडीची नोंद व्यपगत अनामत रक्कम खात्यामध्ये रोखपालाकडून करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे मागील ३ वर्षापुर्वीच्या मनपा निधी मध्ये जमा करण्यात येणा-या अनामत रक्कमा खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कालावधी | अनामत रक्कम |
|---|---|---|
| १ | ०१/०७/२०१८ ते ३१/१२/२०१८ | ११३४५८३/- |
| २ | ०१/०६/२०१९ ते १५/०७/२०१९ | ६५७५५७/- |
| ३ | १६/०७/२०१९ ते १०/१२/२०१९ | २८३२६८५/- |
| ४ | ११/११/२०१९ ते ३१/०३/२०२० | ३४३५०४६/- |
| ५ | ०१/०४/२०२० ते ३१/०७/२०२० | ७९८६९२/- |
| ६ | ०१/०८/२०२० ते ३०/१०/२०२० | ६२९२७७/- |
| ७ | ०१/११/२०२० ते १५/०२/२०२१ | १०३२८६५/- |
| ८ | १६/०२/२०२१ ते ३१/१२/२०२२ | ४५७२३०५/- |

याकरिता वरील प्रमाणे महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी देत असतांना मागील ३ वर्षापुर्वीच्या प्राप्त अनामत रक्कमांवर दावा सांगण्यात आला नाही तर अशा अनामत रकमा व्यपगत करून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधील प्रकरण २०नियम क्रमांक २९९ अन्वये मनपा फंडामध्ये जमा करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णयः-**

लातूर शहर महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी देत असतांना मागील ३ वर्षापुर्वीच्या प्राप्त अनामत रक्कमांवर दावा सांगण्यात आला नाही तर अशा अनामत रकमा व्यपगत करून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधील प्रकरण २०नियम क्रमांक २९९ अन्वये मनपा फंडामध्ये जमा करण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

नगर सचिव,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

आयुक्त तथा प्रशासक,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.

**प्रशासकीय ठराव**

**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

ठराव क्रमांकः-407 दि. 12/12/2025

---

**प्रस्तावः-**

**विषयः- डॉ.पंजाब खानसोळे, शासनाच्या प्रतिनियुक्ती वरील उपायुक्त यांना लातूर शहर महानगरपालिका आस्थापनेवरील रिक्त पदावर सामावून घेण्यासाठी शासनास शिफारस करणे बाबत.**

उप सचिव,महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक लामपा- 2012/261/ प्र.क्र.40/ नवि-24,दि.28/5/2013 अन्वये सहपत्र क्र. 1 ते 22 मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार एकूण 1246 पदांचा आकृतीबंध नवनिर्मित लातूर शहर महानगरपालिके करीता शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. लातूर महानगरपालिका मुख्यालयात मंजूर करावयाच्या पदांचा तपशिल मध्ये **उपायुक्त** या पदनामाचे 2 पदे मंजूर आहेत.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः- लामनपा -2016/प्र.क्र.113/नवि-24, 19 सप्टेंबर 2019 अन्वये लातूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम 2019 ला शासन मान्यता दिलेली आहे.तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाची अधिसूचना राजपत्र असाधारण क्रमांक 392, दि.02/11/2019 अन्वये लातूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम 2019, राजपत्रात प्रसिध्द केले आहेत. सदर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम 2019 मधील परिशिष्ठ -2 मध्ये अ.क्र.3 मध्ये **उपायुक्त (श्रेणी 1 प्रशासकीय सेवा)** हे 50% पदोन्नतीने व 50% प्रतिनियुक्तीने दर्शविण्यात आले आहे.

नगर विकास विभाग, शासन आदेश क्रमांकःएमसीओ-2024/प्र.क्र.122/नवि-14, दि.26 मार्च 2024 रोजीच्या आदेशन्वये श्री.पंजाब खानसोळे, पशुधन विकास अधिकारी संवर्ग यांची उपायुक्त लातूर शहर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने नियुक्ती केल्यानुसार ते दि.27/03/2024 रोजी उपायुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर या पदावर रुजू करुन घेण्यात आले आहे.

श्री.पंजाव खानसोळे ,उपायुक्त यांनी लातूर शहर महानगरपालिका लातूर येथे उपायुक्त या पदावर कायम स्वरुपी सामावून घेण्याबाबत दि.11/12/2025 रोजीच्या अर्जान्वये विनंती केली आहे.

मा.श्री.अभिमन्यू पवार, आमदार, औसा विधानसभा यांनी दि.12/12//2025 रोजीच्या पत्रान्वये श्री.पंजाब खानसोळे,उपायुक्त, मनपा, लातूर यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत शिफारस केलेली आहे.

श्री.पंजाब खानसोळे,उपायुक्त यांना लातूर शहर महानगरपालिकेत उपायुक्त पदाच्या कामकाजाचा अनुभव पाहता त्यांना आस्थापनेवरील उपायुक्त या पदावर कायम स्वरुपी सामावून घेण्यासाठी मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेबाबत निर्णयास्तव सादर.

**निर्णयः-**

श्री.पंजाब खानसोळे,उपायुक्त यांना लातूर शहर महानगरपालिकेत उपायुक्त पदाच्या कामकाजाचा अनुभव पाहता त्यांना आस्थापनेवरील उपायुक्त या पदावर कायम स्वरुपी सामावून घेणेस मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

नगर सचिव
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

F:\GAD LATUR\as2021\2022\Metting Note\new meeting - 2022.doc 341

# प्रशासकिय ठराव

## लातूर शहर महानगरपालिका,लातूर

ठराव क्र. ४०२ दि.१५/१२/२०२५

---

विषय :- Appointment of an Agency to Conduct Various Activities of Information Education and Communication

प्रस्ताव :-

स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका मंजूर घटकातील माहिती, शिक्षण, संवाद (IEC) आणि वर्तनातील बदल (BCC) अंतर्गत माहिती तंत्रज्ञान, पथनाट्य, क्षमता बांधणी, नागरीकांशी संवाद इत्यादी द्वारे शहरात स्वच्छतेची व्यापक जनजागृती करण्यासाठी निधी प्राप्त होणार असल्याने एजन्सी नेमुन काम करणेकामी निविदा मागविणे करिता मा.आयुक्त महोदया यांनी मान्यता प्रमाणे सदर निवीदा www.mahatenders.gov.in येथे दि.०५.१२.२०२५ ते दि.१२.१२.२०२५ पर्यंत प्रसिध्द करण्यात आले असून विहीत मुदतीत एकूण ०३ निवीदाधारक प्राप्त असून त्यांचा ०१ लिफाफा (तांत्रीक) उघडण्यात आला असून एकूण ०३ निवीदाधारका पैकी ०१ निवीदाधारक अपात्र झाले असून ०२ निवीदाधारक पात्र असून पात्र निवीदाधारकांचे ०२ लिफाफा (आर्थीक) रोजी उघडण्यात आला असून सदर दर खालील प्रमाणे.

| अ.क्र | कंत्राटदाराचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | ANKUR CREATION | १५,७९,४५०/- |
| २ | K GANESH STUDIO | २२,०५,४०५/- |

वरील प्रमाणे सर्वात कमी ANKUR CREATION यांचे दर सर्वात कमी रू.१५,७९,४५०/- अक्षरी पंधरा लक्ष एकोणसत्तर हजार चारशे पन्नास रूपये फक्त सर्वात कमी असून ANKUR CREATION यांना कार्यादेश देण्याचे उचित निर्णयास्तव सादर.

निर्णय – स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका मंजूर घटकातील माहिती, शिक्षण, संवाद (IEC) आणि वर्तनातील बदल (BCC) अंतर्गत माहिती तंत्रज्ञान, पथनाट्य, क्षमता बांधणी, नागरीकांशी संवाद इत्यादी द्वारे शहरात स्वच्छतेची व्यापक जनजागृती करण्यासाठी निधी प्राप्त होणार असल्याने एजन्सी नेमुन काम करणेकामी ANKUR CREATION यांचे दर सर्वात कमी रू.१५,७९,४५०/- अक्षरी पंधरा लक्ष एकोणसत्तर हजार चारशे पन्नास रूपये यांचे दरास आर्थीक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

नगर सचिव
लातूर शहर महागरपालिका,लातूर

प्रशासक
लातूर शहर महानगरपालिका,लातूर

# प्रशासकीय ठराव
# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**ठराव क्रं.** 409 **दिनांक** 15/12/2025

---

**विषय - लातूर शहर महानरगपालिकेच्या दलित वस्ती भागातील 130 विंधन विहीरीवर सौर ऊर्जा पॅनल संलग्न साहित्यासह बसविणे कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदावर विचार विनीमय करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्तावना -**

ई-निविदा सुचना / 2025-26 अन्वये "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अनुसुचित जाती जमाती व नवबौध्द वस्ती सुधार योजना" अंतर्गत खालील कामाची अंदाजपत्रकीय किमत रु. 17,73,2000.00 ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

| अ.क्रं. | कामाचे नाव | निविदा किंमत |
|---|---|---|
| 1 | लातूर शहर महानरगपालिकेच्या दलित वस्ती भागातील 130 विंधन विहीरीवर सौर ऊर्जा पॅनल संलग्न साहित्यासह बसविणे. | रु. 17,73,2000.00 |

सदर कामासाठी खालील 3 (तीन) निविदाधारक सहभागी झाले होते.

1) बालाजी एन्टरप्रायझेस, 2) एस. बी. सोलार सिस्टीम, 3) फ्युचर क्रीड इंजिनिअर्स

वरील एजन्सीधारकांचा लिफाफा क्रं. 1 (कागदपत्र) दिनांक 15.12.2025 रोजी उघडुन निविदा समितीने निविदाधारकांनी चेकलिस्ट नुसार सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता वरील तिन्ही निविदाधारक पात्र असलेने निविदाधारकांचा लिफाफा क्रं. 2 (देकारपत्रक) दिनांक 15.12.2025 रोजी उघडण्यात आला.

**कामाचे नाव :-** लातूर शहर महानरगपालिकेच्या दलित वस्ती भागातील 130 विंधन विहीरीवर सौर ऊर्जा पॅनल संलग्न साहित्यासह बसविणे.

| अनु क्रं. | एजन्सीचे नाव | दिलेले दर |
|---|---|---|
| 1. | बालाजी एन्टरप्रायझेस | अ. प. दरापेक्षा 1.760% अधिक |
| 2. | एस. बी. सोलार सिस्टीम | अ. प. दरापेक्षा -0.010% कमीचे |
| 3. | फ्युचर क्रीड इंजिनिअर्स | अ. प. दरापेक्षा 1.500% अधिक |

सदर कामासाठीचे न्युनतम (L1) निविदाधारक एस. बी. सोलार सिस्टीम यांची अंदाजपत्रक दरापेक्षा -0.010% कमी दर प्राप्त आहेत.

तरी सदर कामासाठीचे दर म्हणजेच अ. प. दरापेक्षा -0.010% कमीचे दराचे एस. बी. सोलार सिस्टीम यांचे दराची निविदा मंजुर करणेसाठी निर्णयास्तव सादर.

**निर्णय-** "लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अनुसुचित जाती जमाती व नवबौध्द वस्ती सुधार योजना" योजने अंतर्गत लातूर शहर महानरगपालिकेच्या दलित वस्ती भागातील 130 विंधन विहीरीवर सौर ऊर्जा पॅनल संलग्न साहित्यासह बसविणे कामासाठी रु. 17,73,2000.00 Tender ID No. 2025_LMC_1256251_1 या कामासाठीची अ. प. दरापेक्षा -0.010% कमीचे दराचे मंजुर करण्यात येत आहे. सदर काम करणेस मान्यता देण्यात येते.

**नगर सचिव**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

**प्रशासक**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

# प्रशासकीय ठराव
# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

ठराव क्रं. 410 दिनांक 15/12/2025

---

**विषय - "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायम स्वरुपी 75 फुट पुर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणेच्या कामासाठी मागविण्यात आलेल्या निविदावर विचार विनीमय करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्तावना -**

ई-निविदा सुचना 09 / 2025-26 अन्वये"महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास" योजने अंतर्गत खालील कामाची अंदाजपत्रकीय किमत रु. 17,36,41,232.00 ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

| अ.क्रं. | कामाचे नाव | निविदा किंमत |
|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायम स्वरुपी 75 फुट पुर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणे. | रु. 17,36,41,232.00 |

सदर कामासाठी खालील 3 (तीन) निविदाधारक सहभागी झाले होते.

1) M Devang Construction Co, 2) Savani Heritage, 3) Hitech Engineers

वरील एजन्सीधारकांचा लिफाफा क्रं. 1 (कागदपत्र) दिनांक 15.12.2025 रोजी उघडुन निविदा समितीने निविदाधारकांनी चेकलिस्ट नुसार सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता वरील तिन्ही निविदाधारक पात्र असलेने निविदाधारकांचा लिफाफा क्रं. 2 (देकारपत्रक) दिनांक 15.12.2025 रोजी उघडण्यात आला.

**कामाचे नाव :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायम स्वरुपी 75 फुट पुर्णाकृती पुतळा उभारणे व सुशोभिकरण करणे.

| अनु क्रं. | एजन्सीचे नाव | दिलेले दर |
|---|---|---|
| 1. | **M Devang Construction Co** | **अ. प. दरापेक्षा 13.500% अधिक** |
| 2. | Savani Heritage | अ. प. दरापेक्षा 14.100% अधिक |
| 3. | Hitech Engineers | अ. प. दरापेक्षा 19.000% अधिक |

